दैनिक

अन्यायाचा प्रतिकार

# रायगड नगरी

महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

• वर्ष १६ वे • अंक १२७ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शनिवार दि.३१ जुलै २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# पूरामुळे महाड, पोलादपूरातील ५ पूल तुटले; ६ रस्ते पूर्णपणे बंद

## २ मार्गांवरील वाहतूक पर्यायी रस्त्याने ; जिल्हा प्रशासनाची माहिती

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

**अतिवृष्टी आणि महापूरामुळे महाड, पोलादपूर तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. याठिकाणची परिस्थिती पूर्वपदावर आणण्यासाठी युद्धपातळीवर काम सुरु आहे. या अतिवृष्टी, महापूरात अनेक रस्ते, पूलांचे मोठे नुकसान झाले आहे. जिल्हा प्रशासनाने पुरामुळे बंद पडलेले रस्ते व पुलांची माहिती जाहीर केली आहे. त्यानुसार ६ रस्ते पर्यायी मार्ग नसल्याने पूर्णपणे बंद असून, ५ पुलांचे मोठे नुकसान झाल्याने वाहतूक खंडित झाली आहे.तर इतर २ बंद असलेल्या मार्गांवरील वाहतूक पर्यायी रस्त्याने सुरु आहे, याची नागरिकांनी नोंद घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**



२१ व २२ जुलै २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे महाड, पोलादपूर तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पूर परिस्थिती निर्माण झाली. बाधित शहरांमध्ये व गावांमध्ये जनजीवन विस्कळीत झाले आहे. मालमत्तांचे मोठे नुकसान झाले आहे. या कालावधीतच रस्त्यांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. नागरिकांना वाहतुकीसाठी अडचण येऊ नये, याकरिता जिल्हा प्रशासनाने पुरामुळे जिल्ह्यातील बंद पडलेले रस्ते व वाहतूक खंडित झालेले पूलाबाबतची माहिती जाहीर केली असून नागरिकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

**पर्यायी रस्ता नसलेले व बंद पडलेले रस्ते :** पोलादपूर महाबळेश्वर रस्ता रा.मा. १३९ ता. पोलादपूर, पर्यायी रस्ता नाही., बिरवाडी वाळण रस्ता रा.मा. १०१ ता. महाड, पर्यायी रस्ता नाही., बोरज उमरठ रस्ता प्रजिमा १०९ ता. पोलादपूर, पर्यायी रस्ता नाही., भोराव सवाद रस्ता प्रजिमा ६५ ता. पोलादपूर, पर्यायी रस्ता नाही., क्षेत्रफळ कुडपण रस्ता प्रजिमा ७१ ता. पोलादपूर, पर्यायी रस्ता नाही., साखर तळ्याचीवाडी रस्ता प्रजिमा १०० ता. पोलादपूर, पर्यायी रस्ता नाही.

**पर्यायी रस्ता असलेले व बंद पडलेले रस्ते :** अलिबाग मुरुड रस्ता प्ररामा ४ ता. मुरुड, पर्यायी रस्ता आहे., चरई रानवडे रस्ता प्रजिमा ७८ ता. पोलादपूर पर्यायी रस्ता आहे.,

**वाहतूक खंडीत झालेले पूल :** अलिबाग मुरुड रस्ता प्रराम ४ ता. मुरुड, काशिद पूल, बिरवाडी वाळण रस्ता रा. मा. १०१ ता. महाड–बिरवाडी पूल, चरई रानवडे रस्ता प्रजिमा ७८ ता. पोलादपूर–चरई पूल, बोरज उमरठ रस्ता प्रजिमा १०९ ता. पोलादपूर–उमरठ पूल, आंबेत बागमांडला रस्ता रा.मा. १०० ता. श्रीवर्धन–तोराडी पूल

# १३ गावांना धोका; ४१३ कुटुंबांना तातडीने हलविणार : जिल्हाधिकारी



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यातील तळिये गावातील दरड दुर्घटनेने सगळेच हादरले असताना महाड तालुक्यातील आणखी ४ आणि पोलादपूर तालुक्यातील ९ गावांमध्ये तळियेसारखी दुर्घटना येत्या काळात घडू शकते, अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे. एका सर्वेक्षणातून ही बाब समोर आल्यानंतर या गावांतील ४१३ कुटुंबांना तातडीने सुरक्षित स्थळी हलवण्याच्या सूचना रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी दिल्या आहेत. दरम्यान, महाडमधील तळिये गावात दरड कोसळून अनेक घरे त्यात गाडली गेली होती.

महाड तालुक्यातील हिरकणी वाडी, मोहोत सुतारवाडी, मोहोत भिसेवाडी, वाघेरी तर पोलादपूर तालुक्यातील साखर सुतारवाडी, साखर चव्हाणवाडी, साखर पेढेवाडी, केवनाळे, दाभीळ, चरई, माटवण, सवाद आणि कनगुले या गावांमध्ये दरडी कोसळण्याची भीती असल्याने तळियेसारख्या दुर्घटनेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी तातडीने पावले टाकण्यात आली आहेत.

या गावांमधील एकूण ४१३ कुटुंबांना धोका असून या कुटुंबांमध्ये १ हजार ५५५ व्यक्ती आहेत. या सर्वांनाच सुरक्षित स्थळी हलवण्याच्या सूचना दिल्या आहेत.

दोन्ही तालुक्यांमधील संबंधित गावांमध्ये दरड दुर्घटना होऊ शकते असा प्राथमिक अहवाल प्राप्त झाला आहे. त्याआधारावर खबरदारी म्हणून तेथील कुटुंबांना अन्यत्र हलवण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे, असे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सांगण्यात आले आहे. भारतीय भूवैज्ञानिक विभाग यांच्या पुणे युनिटने या भागाचे सर्वेक्षण केले असून त्यांचा अहवाल लवकरच मिळणार आहे, असेही नमूद करण्यात आले आहे.

# अनिल देशमुखांना ईडीने पुन्हा बजावलं समन्स; येत्या सोमवारी बोलावलं चौकशीला

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांना ईडीनं पुन्हा एकदा समन्स बजावलं आहे. ईडीनं अनिल देशमुख यांना सोमवारी २ ऑगस्ट रोजी ईडीच्या कार्यालयात हजर राहण्यास सांगितलं आहे. याशिवाय अनिल देशमुख यांचे सुपुत्र ऋषीकेश देशमुख यांना देखील समन्स बजावण्यात आलं असून त्यांनाही ईडीनं चौकशीसाठी बोलावलं आहे. यापूर्वी अनिल देशमुख यांनी चौकशीसाठी



प्रकृती आणि कोरोनाच्या कारणास्तव उपस्थित राहू शकत नसल्याचं म्हटलं होतं. तसंच व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे चौकशी करण्याची विनंती केली होती.

अनिल देशमुख यांना पुन्हा एकदा ईडीनं समन्स बजावलं असून त्यांना .../२

## संक्षिप्त...

### ...तोपर्यंत वीज बिलाची वसुली करू नका : ऊर्जामंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

गेल्या आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसाचा कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांना मोठा फटका बसला. अनेकांचे संसार पुरामुळे मोडून पडले. घरं पाण्याखाली गेल्यानं लोकांचं अतोनात नुकसान झालं. पूरग्रस्त भागातील जनजीवन पूर्वपदावर येण्यासाठी बराच वेळ लागणार आहे. या परिस्थितीत ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी पूरग्रस्तांना मोठा दिलासा दिला आहे. पूरग्रस्त भागात वीज बिल वसुली करू नका, असे आदेश राऊत यांनी दिले आहेत. परिस्थिती पूर्वपदावर आल्यानंतर बिल भरण्यासाठी सवलत दिली जाईल, असं राऊत यांनी म्हटलं आहे. वीज बिल माफीचा निर्णय अद्याप झालेला नाही. तो निर्णय मंत्रिमंडळ घेऊ शकेल, असंही राऊत यांनी स्पष्ट केलं.

कोकणात वारंवार नैसर्गिक संकटं येत आहेत. त्यामुळे या ठिकाणी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद पथकाचं कायमस्वरूपी तळ निर्माण करण्याची गरज आहे. यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींकडे विनंती करण्याची मागणी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंकडे करणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. रत्नागिरी जिल्ह्यात २२ जुलैला झालेल्या ढगफुटी व अतिवृष्टीमुळे मुख्यत: चिपळूण, खेड, संगमेश्वर आणि राजापूर तालुक्यात महावितरण व महापारेषणच्या यंत्रणांचे अत–ोनात नुकसान झालं आहे. या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी नितीन राऊत यांनी आज चिपळूण तालुक्याला भेट दिली. पुरामुळे नादुरुस्त झालेले मीटर ग्राहकांना त्वरित बदलून देण्याचे निर्देश राऊत यांनी यावेळी महावितरणला दिलेत. भीषण पूरपरिस्थिती असताना स्वत:चा जीव धोक्यात घालून सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांचं त्यांनी यावेळी कौतुक केलं.

# द्रोणागिरी डोंगराच्या उत्खननामुळे डाऊरनगर तळीयेच्या वाटेवर



**दै.रायगड नगरी । उरण**

रायगड जिल्ह्यत मुसळधार पावसात भुस्सखलनाच्या घटना मोठया प्रमाणात घडत असताना उरण तालुक्यातील डाऊर नगर ही वस्ती द्रोणागिरी डोंगराच्या पायथ्या लगत असल्याने आणि या डोंगराच्या पायथ्याशी झालेल्या मोठया प्रमाणात माती उत्खनांमुळे यांच्यावर पण निसर्गाचा घाला घालण्याची दाट शक्यता आहे त्यामुळे शासनाने या वस्त्यांना वाचविण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न करणे गरजेचे आहे.

द्रोणागिरी डोंगर गेले अनेक वर्षे उरण आणि येथील प्रकल्पांचे संरक्षण करीत आहे. याचा पायथ्याशी डाऊरनगर आणि इतर वस्त्या वसल्या आहेत परप्रांतीयांनी ही या द्रोणागिरीच्या पायथ्याशी अतिक्रमणे केली आहेत. तसेच इतिहास प्रसिद्ध द्रोणागिरी डोंगराच्या पायथ्याशी गेले अनेक वर्षे माती उत्खन होत आहे. या माती उत्खनांमुळे पाणी मुरून भुस्–सखलन होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. गेले अनेक वर्षे द्रोणागिरी डोंगर बचाव मोहीम साठी विविध सामाजिक संघटना एकत्र येऊन आंदोलन ही केली आहेत. त्यात उरण सामाजिक संघटना आग्रही होती. आंदोलने करूनही हे होत असलेली उत्खनन न थांबता या वर्षी आणखी जोराने सुरू होते. मात्र या उत्खनांमुळे पाणी मुरून भुस्सखलन होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे डाऊर नगर आणि येथील इतर वस्तीला वाचवायचे असेल तसेच महाड मधील मलीये सारखी घटना घडू नये या साठी शासनाने या कडे लक्ष केंद्रित करावे अशी आग्रही मागणी जोर धरू लागली आहे.

# पुरामुळे नुकसान होवू नये यासाठी आता कठोर निर्णयांची गरज : मुख्यमंत्री

**कोल्हापूर : वृत्तसंस्था**

पूरबाधित क्षेत्रातील गावे तसेच दरडी कोसळण्याचा धोका असलेल्या वस्त्यांचे चांगल्या पद्धतीने पुनर्वसन करण्यावर राज्यशासनाचा भर राहील, असे सांगून भविष्यात पूरपरिस्थितीत नागरिकांचे नुकसान होवू नये, यासाठी आता काही कठोर निर्णय घ्यावे लागतील, असा इशारा मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी दिला.



कोल्हापूर जिल्ह्यातील नृसिंहवाडी, शिरोळ, शाहूपुरी, पंचगंगा हॉस्पिटल, शिवाजी पूल आदी ठिकाणच्या पूरबाधित भागाची मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी पाहणी केली. यानंतर पूर परिस्थितीबाबत सर्किट हाऊस येथील राजर्षी शाहू सभागृहात मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली, यावेळी ते बोलत होते.

बैठकीसाठी ग्रामविकास मंत्री हसनमुश्रीफ, जिल्ह्याचे पालकमंत्री सतेज पाटील, आरोग्य राज्यमंत्री राजेंद्र पाटील–यड्रावकर,नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर,उर्वरित वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष योगेश जाधव, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष राहुल पाटील, खासदार सर्वश्री संजय मंडलिक, धैर्यशील माने, आमदार सर्वश्री ऋतुराज पाटील,प्रकाश आवाडे, चंद्रकांत जाधव, राजेश पाटील, जयंत आसगावकर, प्रकाश आबीटकर यांच्यासह माजी आमदार उल्हास पाटील, डॉ. सुजित मिणचेकर, सत्यजित पाटील, मुख्य सचिव सीताराम कुंटे, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, महानगरपालिका आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, मुख्यकार्यकारी अधिकारी संजयसिंह चव्हाण, जिल्हा पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री उध्दव ठाकरे म्हणाले, राज्यात कोल्हापूर, सांगलीसह अन्य काही जिल्ह्यांवर अतिवृष्टिमुळे पुराचे संकट ओढावले. नदी, नाले, ओढ्यांवर नागरिकांनी अतिक्रमण केल्यामुळे ही स्थिती उद्भवते आहे. रेड –ब्ल्यूलाईनमध्ये झालेल्या बांधकामुळे ही स्थिती निर्माण झाली आहे. भविष्यात अशा बांधकामांना परवानगी देवू नये, या भागात झालेली अतिक्रमणे काढावीत, अशा सक्त सूचना मुख्यमंत्रीउद्धव ठाकरे यांनी यावेळी दिल्या.

पुरामुळे झालेली हानी, 'मी पाह–तो आहे, यातून नक्कीच मार्ग काढण्यात येईल. स्थलांतर करून प्रशासनाने लाखो नागरिकांचे प्राण वाचविल्याबद्दल प्रशास–नाला धन्यवाद. कोविड, पूर व पुराच्या अनुषंगाने झालेले नुकसान व पुरामुळे रोगराई रोखण्याचे राज्यापुढील .../२

# सामाजिक बांधिलकी जपत व्हीडीआयपीएलकडून महाड पूरग्रस्तांना मदत

## महाड पूरग्रस्तांना ७०० चादर, ७०० ब्लँकेट आणि १४०० टॉवेलची मदत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

समाजाचे देणेदार लागतो या भावनेतून सामाजिक बांधिलकी जपत वैभव देशमुख इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड पनवेल अर्थात व्हीडीआयपीएलच्या वतीने महाड पूरग्रस्तांना ७०० चादर, ७०० ब्लँकेट आणि १४०० टॉवेल आदी साहित्याची मदत पाठविण्यात आली आहे.



आज शुक्रवारी (दि. ३० जुलै) सकाळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत व ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली व्हीडीआयपीएलच्यावतीने पनवेल येथून महाड येथे मदत साहित्य रवाना झाले. यावेळी उद्योजक अजय कांडपिळे, भाजपचे तालुका चिटणीस जयवंत देशमुख, रमेश देशमुख, व्हीडीआयपीएलचे व्यवस्थापकीय संचालक वैभव देशमुख,संचालक अमोल देशमुख, युवा नेते गौरव कांडपिळे आदी उपस्थित होते.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी बोलताना सांगितले कि, अतिवृष्टीमुळे महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी पुराचे संकट आले. या परिस्थितीत पूरग्रस्तांना मदतीचा .../२

# मांडला पूलाची दुरावस्था : प्रशासन काशिद पूल घटनेच्या पुनरावृत्तीची वाट बघतेय काय?

**दै.रायगड नगरी । कोलई**

पावसाळा सुरु होऊन महिना होतो न होतो तोच मुरुड तालुक्यातील बोर्ली–मांडला पंचक्रोशीतील मांडला ते काकळघर रस्त्याची पार दुरावस्था झालेली असून मांडला पूलाची दुरावस्था पाहाता प्रशासन काशिद पूल घटनेच्या पुनरावृत्तीची वाट बघतेय काय?असा सवाल नागरिकांतून विचारला जात असून याकडे संबंधित बांधकाम खात्याच्या दुर्लक्षाबाबत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



अलिबाग–मुरुड रस्त्यावर मांडला ते काकळघर या अंदाजे पाच कि.मी. रस्त्याची गेल्या दोन तीन वर्षापासून पार दुरावस्था झालेली असून जागोजागी खाच–खळगे व खड्डे पडल्यामुळे वाहनचालक व ये–जा करणा–यांना त्रास व हाल सहन करावे लागत आहेत. मांडल्या पासुन गावात जाणाऱ्या पूलाची दयनीय अवस्था असून मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. मागील वर्षी हा पूल कमकुवत झाल्याने पुलावरील अवजड .../२

# मंदिरातले मस्तवाल

विधिमंडळ सभागृहे काय किंवा संसदेची दोन्ही सभागृहे काय, ही लोकशाहीची पवित्र मंदिरे आहेत आणि त्यांचे पावित्र्य जपले गेलेच पाहिजे. मात्र, निर्वाचित सदस्यांच्या विशेषाधिकारांच्या नावाखाली बहुतेक सर्व प्रतिनिधीगृहांमध्ये बेछूट वर्तन करण्याचा घातक पायंडा पडला आहे. सर्वोच्च न्यायालयाने लोकप्रतिनिधींच्या या विशेषाधिकारांच्या सीमा महत्त्वपूर्ण निकालाने मर्यादित केल्या आहेत. देशाच्या भूमीवर कुठेही केलेले हिंस्र वर्तन हे फौजदारी कायद्यात गुन्हा ठरावे आणि तेच वर्तन सभागृहाच्या आत मात्र विशेष हक्कांच्या नावाखाली संरक्षित व्हावे, हा गेले अनेक दशके चालत आलेला विरोधाभास एकदाचा संपविल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाचे खास अभिनंदन. खरेतर, या 'उंटावरची शेवटची काडी' पडूनही अनेक वर्षे झाली. २०१४ सालच्या सार्वत्रिक निवडणुका घोषित होण्याच्या काही महिने आधी स्वतंत्र तेलंगण राज्य निर्माण करण्याचे विधेयक लोकसभेच्या पटलावर आले; तेव्हा याला विरोध करणारे तेलुगू देसमचे खासदार एल. राजगोपाल यांनी खिशातून मिरची-मीरपूड भरलेला स्प्रे काढून सभागृहात फवारला. टेबलांवरच्या काचा, माईक आणि छोट्या वस्तूंची फेकाफेक तर चालूच होती. यावेळी, रुग्णवाहिका बोलावून काही खासदारांना रुग्णालयात न्यावे लागले. तरीही, हा प्रकार म्हणजे जणू खासदारांच्या विशेष हक्कांचा आविष्कार होता, असा काहींचा समज होता. एका वेगळ्या प्रसंगी दिवंगत भाजपनेते अरुण जेटली यांनी 'जेव्हा सरकार ऐकतच नाही, तेव्हा सभागृहाचे कामकाज (गोंधळ घालून) बंद पाडणे, हा संसदीय लोकशाहीतील अधिकारांचा एक भाग आहे,' असे वादग्रस्त समर्थन केले. मात्र, अशावेळी सदस्य शांतपणे सभात्याग करीत नाहीत. सर्वोच्च न्यायालयासमोर आलेल्या खटल्यात काँग्रेसप्रणित आघाडीचे सरकार असताना केरळ विधानसभेत कम्युनिस्टप्रणित डाव्या आघाडीच्या आमदारांनी १३ मार्च, २०१५ रोजी अर्थसंकल्प मांडला जात असतानाच दिसेल ती वस्तू मोडून, फेकून सदनाची 'उद्ध्वस्त धर्मशाळा' करून टाकली. दुर्दैव म्हणजे, नंतर काँग्रेस आघाडीचा पराभव करून डावी आघाडी सत्तेवर आली तेव्हा मुख्यमंत्री पिनारी विजयन यांनी या प्रकरणातले सारे फौजदारी गुन्हे हे 'निर्वाचित लोकप्रतिनिधींच्या विशेष अधिकारांचा भंग' या सबबीखाली रद्दबातल ठरवले. हे प्रकरण केरळ उच्च न्यायालयात गेले. तेथे हे गुन्हे शाबूत राहून खटले चालवा, असे न्यायालयाने म्हटले. आता सुप्रीम कोर्टाने या निकालावर शिक्कामोर्तब केले आहे. न्यायमूर्ती डॉ. धनंजय चंद्रचूड आणि त्यांचे सहपीठाधीश न्यायमूर्ती एम. आर. शहा यांनी 'देशातील इतर सर्वसाधारण कायद्यांपासून संरक्षण मिळणारी ढाल म्हणजे विशेषाधिकार नाहीत,' असे निखालस म्हटले आहे. विधिमंडळात गोंधळ, हिंसा किंवा गैरवर्तन करणाऱ्या लोकप्रतिनिधींचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य त्यांच्यावर फौजदारी कारवाई केली तर संकटात सापडते, हा युक्तिवाद खंडपीठाने अमान्य केला. भारतीय कायद्यांचा विकास हा ब्रिटिश धर्तीवर झाला आहे. त्यामुळे, न्या. चंद्रचूड यांनी ब्रिटिश पार्लमेंटमधील अधिकारांचा संदर्भ दिला. तेथे ब्रिटिश संसद सदस्यांचे विशेष अधिकार हे इतर कायद्यांपेक्षा मोठे नाहीत, असे न्यायमूर्तींनी म्हटले आहे. अलीकडे भारतीय प्रतिनिधी गृहांमध्ये बेछूट आणि मस्तवाल वर्तन करणाऱ्यांचे प्रमाण वाढते आहे. अनेक वर्षांपूर्वी तामिळनाडूच्या दिवंगत मुख्यमंत्री जे. जयललिता यांच्यावर सभागृहातच हल्ला झाला. सत्ताधारी किंवा विरोधी सदस्यांचे असे वर्तन हे 'लोकप्रतिनिधींचे विशेषाधिकार' अशा संज्ञेखाली समर्थनीय ठरू शकत नाही. मात्र, बऱ्याच निर्वाचितांना आपण लोकसेवक असल्याचा विसर पडतो. त्यातूनच, ते जागोजागी उर्मट आणि असंस्कृत वर्तन करतात. हेच वर्तन मग सभागृहांमध्येही होते. भारतात सर्व प्रतिनिधीगृहांमध्ये गोंधळामुळे वाया जाणाऱ्या वेळ व इतर खर्चाचा हिशेब तर सोडाच; पण आजवर लक्षावधी रुपयांच्या सार्वजनिक मालमत्तेची नासधूस झाली आहे. या केरळ विधानसभेतील हिंसाचारात तेव्हा दोन लाखांचे नुकसान झाले होते. 'आपले म्हणणे मांडण्यासाठी कायदा हातात घेतला तरी चालतो', हा लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांशी द्रोह करणारा संदेश आपण साऱ्या समाजाला देत आहोत, याचे भान लोकप्रतिनिधींना नसणे, हा त्यांचा पहिला अपराध आहे. आणि, तशा वर्तनाचे समर्थन भारतीय राज्यघटनेतील 'अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य' या अतिशय पवित्र अधिकाराच्या छत्राखाली करणे, हा दुसरा अपराध आहे. सर्वोच्च न्यायालयाने लोकप्रतिनिधींच्या विशेष अधिकारांची केलेली बांधबंदिस्ती म्हणूनच स्वागतार्ह आहे. आता खरेतर केरळसहित देशातील सर्व प्रतिनिधी गृहांमध्ये झालेले लोकमालमत्तेचे नुकसान सदस्यांच्या वेतन किंवा निवृत्तीवेतनातून कापून घ्यायला हवे.

# पोलादपूर तालुक्यातील दरडग्रस्त अन् पुरग्रस्त भागातील जनजीवन पुर्वपदावर आणण्यासाठी आत्मियतेने प्रयत्न सुरू : ना.आदिती तटकरे



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील कामथी नदीलगतच्या गावात पुलांचे अप्रोच रस्ते वाहून गेले, साखर सुतारवाडी व केवनाळे या ठिकाणी मोठमोठ्या दरडी कोसळल्याने ११ जणांचा मृत्यू व १४ जण जखमी झाले आहेत. अन्य ठिकाणी दरडी कोसळून रस्ते बाधित झाल्याने दळणवळण बंद झाले आहे. मृतांच्या नातेवाईकांना सानुग्रह अनुदानाच्या ९ लाखांपैकी ४ लाख रुपयांचा पहिला हप्ता बँक खात्यात जमा करण्यात आला असून जखमींवर जे.जे. हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू असताना १५ हजारांचे अनुदान जमा करण्यात आला आहे. रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री म्हणून सर्वांना सोबत घेऊन आपण जनजीवन पुर्वपदावर आणण्यासाठी आत्मियतेने प्रयत्न करत आहोत, अशी ग्वाही रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री ना.अदिती तटकरे यांनी दिली.

पोलादपूर तालुक्यातील आडावळे बुद्रुक ग्रामपंचायत हद्दीतील चिखली येथील पुल, मोरसडे येथील आडाचा कोंड व गवळ्याचा कोंड येथील पुल, चांदले येथील पुल, कामथे येथील दरडग्रस्त भाग तसेच अन्य दरडग्रस्त भागाची पाहणी केल्यानंतर ना.अदिती तटकरे यांनी प्रस्तुत प्रतिनिधीसोबत केलेल्या वार्तालापावेळी ही माहिती दिली.

यावेळी पालकमंत्री ना. अदिती तटकरे यांच्या सोबत पोलादपूर आपत्ती निवारणकामी प्रतिनियुक्तीवर असलेले पेणचे प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार, राष्ट्रवादी सेवादलाचे वाय.सी. जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मण खेडेकर महाराज, जिल्हा सरचिटणीस सुहास मोरे, शहर अध्यक्ष अजित खेडेकर, मोरसडेचे सरपंच भिवाशेठ उतेकर, आडावळेच्या विद्यमान सरपंच सारिका रमेश घाडगे आणि माजी सरपंच रेणुका उतेकर, अनिलकुमार भोसले, गटविकास अधिकारी जगताप, पुरोगामी युवक संघटनेचे अध्यक्ष चंद्रकांत सणस, बारकू शिंदे, मनोहर पार्टे, चंद्रकांत उतेकर तसेच विविध बाधित परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना दिलेली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी : डॉ.सुहास माने

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यातील महाड व पोलादपूर तालुक्यात अतिवृष्टीमुळे पूरपरिस्थिती निर्माण झाली होती. यामुळे महाड, पोलादपूर तालुक्यात दरड कोसळून तळीये गावात अनेक लोक ढिगाऱ्याखाली अडकून मयत झाले आहेत. तसेच महाड शहरात पुराचे पाणी शिरल्याने नुकसान झालेले आहे. त्यामुळे साथीचे आजार निर्माण होण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर येथे नेमलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना दिलेली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी, असे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने यांनी आदेशित केले आहे. महाड पोलादपूर तालुक्यात साथीचे आजार पसरू नयेत, यासाठी जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने यांच्या नियंत्रणाखाली वैद्यकीय अधिकाऱ्यांना विविध कामाच्या जबाबदारी देण्यात आल्या आहेत. जिल्हास्तरावर १) डॉ.गजानन उत्तमराव गुंजकर, निवासी वैद्यकीय अधिकारी, गट-अ, मोबाईल क्र.९०७५१५४५२५/ ९४०५३८२९९५ २) डॉ.समीर पोटे निवासी वैद्यकीय अधिकारी गट-अ, मोबाईल क्र.९८८१३०७७२९ जिल्हास्तरीय नोड ऑफिसर नेमणूक करण्यात येत आहे. ३) श्रीमती संध्या सावंत-देसाई, लघुटंकलेखक (स्टोनो) सामान्य रुग्णालय अलिबाग मोबाईल क्र. ९८८१९१५०२५ जबाबदारी व करावयाच्या उपाययोजना- डॉ. गुंजकर व डॉ.पोटे निवासी अधिकारी व जिल्हास्तरीय साथ रोग सनियंत्रण नोडल ऑफिसर यांनी एनडीआरएफ/एनडीआरएफ यांच्या निकषानुसार वस्तुनिष्ठ दैनंदिन माहिती गोळा करुन घेणे व श्रीमती संध्या सावंत-देसाई यांच्याकडून ही माहिती विहित नमुन्यात तयार करुन दैनंदिन पूरस्थिती व साथरोगाचा अहवाल वरिष्ठ कार्यालयास दररोज वेळेत सादर करणे.

डॉ.भास्कर विष्णू जगताप, वैद्यकीय अधीक्षक ग्रामीण रुग्णालय, महाड यांना महाड-पोलादपूर पूरपरिस्थितीत साथीचे आजार निर्माण होऊ नये, याच्या उपाययोजनेकरिता स्थानिक सनियंत्रण अधिकारी/नोडल ऑफीसर म्हणून नेमणूक करण्यात येत आहे. मोबाईल क्र.९४२२३७४७२२/८९७५५२२६६७

जबाबदारी व करावयाच्या उपाययोजना- शासकीय वैद्यकीय पथक व खाजगी वैद्यकीय पथकाची ड्युटी लावणे, स्वच्छता ठेवणे, वीज पुरवठा व तेथील सनियंत्रण करणे इत्यादी कामे. एस.एस.हजवाने- औषध निर्माण अधिकारी, ग्रामीण रुग्णालय, महाड मोबाईल क्र. ९३७३६४१५९०/ ७७४५०७४४४५ -फार्माशिस्ट जबाबदारी व करावयाच्या उपाययोजना- औषध गोळयांचा पुरवठा करणे नियंत्रण ठेवणे. डॉ.सूर्यकांत हनमंते- वैद्यकीय अधिकारी ग्रामीण रुग्णालय, महाड जबाबदारी व करावयाच्या उपाययोजना- नॉन कोविड वैद्यकीय सेवा देणे, आंतररुग्ण व बाह्यरुग्ण विभागात वैद्यकीय सेवा देणे, सर्प, दंश सेवा देणे व प्रसुती व सिझेरीयन सेक्शन विभागात वैद्यकीय सेवा देणे. डॉ.दिपक अडकमोल, वैद्यकीय अधिकारी ग्रामीण रुग्णालय, महाड मोबाईल क्र.९५११९४२२६४- जबाबदारी व करावयाच्या उपाययोजना- चच-, ऊउकऊ कोविड सेंटर महाड येथे कोविड रुग्णांना सेवा देणे, ऑक्सीजन पुरवठा, औषध व साधन सामग्री पुरेशा प्रमाणात उपलब्ध ठेवणे. डॉ.भाग्यरेखा जंबू पाटील (स्त्री रोगतज्ञ) वैद्यकीय अधीक्ष ग्रामीण रुग्णालय, पोलादपूर मोबाईल क्र.९५५२५६५८४९/ ९४२३८९३२५१-महाड जबाबदारी व करावयाच्या उपाययोजना- डॉ.जगताप यांच्या समवेत गरजेनुसार सिझेरीयन विभागाचे कामकाज करणे, या सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना दिलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडण्याविषयी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने यांनी आदेशित केले आहे.

# गरीब कामगाराच्या मदतीसाठी मनसे आली धावून ; मिळवून दिले घामाचे थकीत एक लाख रुपये



**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यात हार्दिक ग्रुप यांचे एका इमारतीचे बांधकाम चालु आहे. येथील मालक श्री जग्गी यांच्याकडे खोपोली येथील कामगार सलीम शेख यांचे अनेक दिवसांपासून कामाचे एक लाख रुपये थकीत होते. मनसे सुधागड तालुकाध्यक्ष सुनील साठे यांनी गुरुवारी (ता.२९) मनसे स्टाईलने सलीम शेख यांची थकीत रक्कम मिळवून दिली.

वारंवार तगादा लावून देखील सलीम शेख यांना त्यांचे पैसे मिळत नव्हते. मग त्यांनी मनसे सुधागड तालुकाध्यक्ष सुनील साठे यांच्याकडे संपर्क साधला. सुनिल साठे यांनी श्री जग्गी यांना ताबडतोब फोन करुन सलीम शेख यांचे पैसे देण्यासाठी सांगितले. त्याप्रमाणे शेख यांना निम्मी रक्कम दिली असून पुढिल १५ दिवसांत निम्मी रक्कम देणार असे श्री जग्गी यांनी सांगितले. इतक्या दिवसांपासून थकीत असलेले घामाचे पैसे परत मिळाल्याने सलीम शेख यांनी राज ठाकरे, सुनील साठे व मनसेचे आभार मानले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## अनिल देशमुखांना ईडीने पुन्हा बजावलं समन्स; येत्या सोमवारी बोलावलं चौकशीला

२ ऑगस्ट रोजी ईडीच्या कार्यालयात चौकशीसाठी हजर राहण्यास सांगितले आहे. काही दिवसांपूर्वी ईडीने अनिल देशमुखांच्या घरी छापे मारले होते. यानंतर ईडीने त्यांना ४ समन्स पाठविले होते. मात्र अनिल देशमुख यांनी ईडी चौकशीला प्रत्यक्ष हजर राहण्यास असमर्थता दर्शवली. तसेच वय, आजारपण आणि कोरोनाच्या धोक्याचं कारण पुढे करत मंगळवारी अनिल देशमुखांनी ईडीच्या चौकशीला हजर राहण्यास नकार दिला. त्याऐवजी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे आपला जबाब नोंदवण्याची तयारी त्यांनी दाखवली होती. अनिल देशमुख यांच्या वकीलांनी ईडीकडे ८ दिवसांची मुदत मागितली होती.

## पुरामुळे नुकसान होवू नये यासाठी आता कठोर निर्णयांची गरज : मुख्यमंत्री

प्रमुख आव्हान असून राज्यसरकार याचा धैर्याने मुकाबला करेल. निसर्ग, तौक्ते चक्रीवादळातील नुकसानग्रस्तांना आधार देण्याचं काम राज्यशासनाने केले आहे. पूरपरिस्थितीत झालेल्या नुकसानीच्या पंचनाम्यांचा आढावा घेवून राज्य शासन पूरग्रस्तांना भरीव मदत करेल, यासाठी केंद्राकडे ही आर्थिक मदत मागितली जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले.

जिल्ह्यातील पशुधन जगविण्यासाठी पुढाकार घेतलेल्या चार साखर कारखान्यांच्या कामाचे कौतुक करुन उर्वरित साखर कारखान्यांनी या कामी पुढाकार घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी केले. राष्ट्रीय महामार्गावर पुरामुळे उद्भवणाऱ्या परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी उड्डाणपुलांचे नियोजन करावे लागेल. खरडून गेलेल्या शेतीचे व पिकांचे पंचनामे तात्काळ करावेत, या कामी आवश्यक त्या ठिकाणी पंचनाम्यांसाठी ड्रोनचा वापर करावा. कोल्हापूर शहर सुधारणेच्या दृष्टीने महानगरपालिकेला आवश्यक निधी राज्यशासन देईल, मात्र त्याचा विनियोग योग्य पध्दतीने व्हावा, अशी सूचनात्यांनी केली.

ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले, अतिवृष्टीमुळे राज्यात झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी केंद्रीय पथकाने यावे. या भीषण पूरपरिस्थितीत केंद्राने राज्याला मदत करावी. आपत्तीत झालेल्या नुकसानीसाठी केंद्राकडे ज्यादा मदत मागण्यास सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी एकत्र येणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले. पूरपरिस्थितीत मानवतेच्या भावनेतून कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे श्री. मुश्रीफ यांनी आभार मानले. 'मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील पूरबाधित शहर व ग्रामीण भागाची पाहणी करण्यासाठी वेळ दिला, याबद्दल तमाम कोल्हापूरकरांच्या वतीने आभार अशा शब्दात पालकमंत्री सतेज पाटील यांनी आभार मानले. तत्पूर्वी जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनीजिल्ह्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची तर महापालिका आयुक्त डॉ. बलकवडे यांनी शहरातील नुकसानीची सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

## सामाजिक बांधिलकी जपत व्हीडीआयपीएलकडून महाड पूरग्रस्तांना मदत

हात आणि धीर दिला जात आहे. सामाजिक जबाबदारी म्हणून वैभव देशमुख इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेडने यापूर्वीही विविध प्रकारचे सामाजिक उपक्रम राबविले आहेत, असे सांगून पूरग्रस्तांना मदत करून सामाजिक बांधिलकी कायम जपली आहे, असेही म्हंटले.

## प्रशासन काशिद पूल घटनेच्या पुनरावृत्तीची वाट बघतेय काय?

वाहतूक काही काळ बंद करण्यात आली होती. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे याभागातील अनेक वाहन चालकांना आपली वाहने चालवण्यात कसरत करावी लागते आहे तर काहींना अपघाताला सामोरे जावे लागले आहे.मांडल्या पासून म्हाळुंगे कडे जाताना नदी लगतच्या रस्त्याची पार दुरावस्था झालेली असून याठिकाणी दुरुस्ती बरोबरच रस्त्याची उंची वाढविणे अत्यंत गरजेचे आहे. याबाबत मांडला ग्रामपंचायतीच्या सरपंच सुचिता सुरेश पालवणकर यांनी ग्रामस्थांच्या वतीने संबंधित अधिकारी वर्गाला वेळोवेळी निवेदने देण्यात येऊन मागणी करण्यात आली आहे.

शासनाच्या तसेच जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने यात लक्ष पुरवून मांडला ते काकळघर रस्त्यावरील खड्डे बुजविण्याची मागणी पंचक्रोशीतीतून होत असून मांडला पूलाची दुरावस्था पाहाता तातडीने उपाययोजना करणे अत्यावश्यक असून प्रशासन काशिद पूल घटनेच्या पुनरावृत्तीची वाट बघतेय काय?असा सवाल नागरिकांतून विचारला जात आहे.

# केएन फाऊंडेशन व संवेदना चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून चिपळुण, महाड येथील पुरग्रस्तांना मदत करण्याचे आवाहन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गेल्या काही दिवसापासून पडलेल्या मुसळधार पावसामुळे कोकणातील जनजीवन पूर्णतः विस्कळीत झाले असून अनेक गावात व घरात, वाड्यांत पाणी शिरल्याने तेथील रहिवाशांचे हाल झाले आहेत. अशांना मदत म्हणून सामाजिक कार्यात अग्रेसर असणार्या पनवेलसह नवी मुंबई, मुंबई परिसरात नेहमीच मदत करणार्या केएन फाऊंडेशन व संवेदना चॅरिटेबल ट्रस्टच्या संस्थापिक अध्यक्षा कोमल खोचरे (तावरे) यांनी त्यांच्या फाऊंडेशनच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात आतापर्यंत मदत केली आहे.



तशीच मदत इतर नागरिकांनी, संस्थांनी करावी असे आवाहन सुद्धा केले आहे.

गेल्या काही दिवसापासून घडलेल्या या घटनेमुळे तेथील रहिवाशांचे पूर्णतः हाल झाले आहेत. अशांना मदतीचा हात म्हणून जीवनावश्यक वस्तू, औषधे, कपडे तसेच घरगुती साहित्य याचे वाटप केएन फाऊंडेशन व संवेदना चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून आतापर्यंत करण्यात आले आहेच.

तरी नागरिकांनी सुद्धा पुढे येवून त्यांच्या परिने जेवढी होईल तेवढी मदत करावी असे आवाहन संस्थापिका अध्यक्षा कोमल खोचरे (तावरे) यांनी केले आहे.

# मेढा आदिवासी, रेवोली आदिवासी बांधव लाभार्थींना खावटीचे वाटप

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विभागाच्या मार्फत व एकात्मिक आदिवासी विकास कार्यालय पेण यांच्या वतीने रोहा तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत मेढा येथील आदिवासीवाडी मेढा, आदिवासीवाडी रेवोली बांधव लाभार्थींना खावटीचे वाटप रोहा पंचायत समितीचे माजी. सभापती लक्ष्मण महाले, ग्रामपंचयातीचे उपसरपंच उदय मोरे मेढा हायस्कुलचे चेअरमन भगवान गोवर्धने, पेणचे प्रकल्प अधिकारी भानुशाली साहेब, तालुका निरिक्षक फसाले यांच्या हस्ते १८ किलो पॅकेजचे वाटप करण्यात आले. तसेच लाभार्थींच्या खात्यामध्ये २०००/- रक्कम जमा करण्यात आली.

महाराष्ट्र राज्य च्या राज्यमंत्री तथा रायगड जिल्हाच्या कर्तत्वदक्ष पालकमंत्री नामदार आदिती तटकरे यांनी रायगड जिल्हासाठी भरीव निधी उपलब्ध करत असताना जिल्हातील सर्वच आदिवासी बांधवांना कोरोना काळात आर्थिक मदतीची असणारी गरज ओळखून सर्वत्र खावठी वाटपाचा कार्यक्रम संपन्न करण्यात आला.

तर मेढे येथे संपन्न झालेल्या या कार्यक्रमला प्रकल्प अधिकारी भानुशाली, माजी सरपंच विलास उंबरे, ग्रामपंचायत सदस्य नम्रता महाले, शेवंती शिद, माजी उपसरपंच दिनेश घरट, तालुका अधिकारी फसाले, गायकवाड,पाटील, ए.स. सोडेकर, पी.के. पाटील, मोर्ले, पी.डी. मोरे, प्रशांत महाले, प्रिती खांडेकर, पोलीस पाटील, हरिश्चंद्र घरट, भिसे तंटामुक्त अध्यक्ष हरिश्चंद्र ठमके उपस्थित होते. तर मेढे ग्रा.पं.हद्दीतील रेवोली येथील ३७ लाभार्थी व मेढा येथील ३४ लाभार्थींना खावटी वाटप करण्यात आले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## आगीच्या त्या घटनेत मृत्युमुखी पावलेल्या अग्निशमन दलाच्या जवानांना शाहिद दर्जा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

५ डिसेंबर २०२० मध्ये तळोजा औद्योगिक वसाहतीत मोदी केम फार्मा या रासायनिक कारखान्यामध्ये लागलेल्या आगीत बचाव कार्य करीत असताना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अतिरिक्त अंबरनाथ अग्निशमन केंद्रातील दिवंगत बाळु दामु देशमुख यांना वीरमरण आले होते.

महाराष्ट्र आद्योगिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळाने बाळु देशमुख यांना शहिद दर्जा देण्याचा ठराव मंजूर करून शासनाकडे पाठविला होता.त्या ठरावाला शासनाने मंजुरी दिली असुन यासंदर्भात शासनाच्या उद्योग ,ऊर्जा व कामगार विभागाच्या वतीने शासन निर्णय जाहीर केला आहे.



अवर सचिव किरण जाधव यांच्या स्वाक्षरीने हा निर्णय डिजिटल स्वाक्षरीने सार्वजनिक करण्यात आला आहे.या निर्णयामुळे दिवंगत बाळु देशमुख यांच्या कुटुंबियांना शासनाच्या सोयी सुविधांचा लाभ मिळणार आहे.यामध्ये देशमुख कुटुंबियांना निवासी जिल्ह्यात किंवा निवासी जिल्ह्याच्या ज्या महसुल विभागात समावेश होतो त्या महसुल विभागातील त्यांच्या पसंतीच्या एक सदनिका विनामूल्य म्हाडाच्या योजनेत दिली जाईल.

सदनिका उपलब्ध नसेल तर अनुज्ञेय असलेल्या क्षेत्रफळानुसार तीन हजार चौरस फूट या दराने रोख रक्कम देण्यात येईल.यासह पात्रतेनुसार कुटुंबातील एका सदस्याला महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळात अनुकंपा तत्वावर नोकरी,२५ लाख सानुग्रह अनुदान यापैकी ५ लाख रोख रक्कम वारसदारांना देण्यात येईल व उर्वरित २० लाख कायदेशीर वारसदारांच्या नावाने १० वर्षाकरिता मुदत ठेव म्हणून देण्यात येणार आहे. सदर निधी १० वर्षापर्यंत वारसदारांना काढता येणार नसुन त्याचा व्याज प्रत्येक महिन्याला काढता येणार आहे. दोन अपत्यांचा शाळा ,महाविद्यालयीन खर्च शासन उचलणार आहे. संबंधित अधिकारी मृत पावलाच नाही अस गृहीत धरून जे वेतन सेवा बजावताना बाळु देशमुख यांना मिळत होते तेच वेतन त्यांच्या कुटुंबातील जो सदस्य कामावर रुजु झाला आहे त्यांना देण्यात यावे असे या शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे.

## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

## नावात बदल

मी खाली सही करणार **कु.रत्नमाला भिमराव काळे** (Ratnamala Bhimrao Kale) **(जुने नाव)**, फ्लॅट नं.४-बी/२०४, शिव कल्पतरु प्लॉट नं.०१, सेक्टर १७, कामोठे-४१०२०९

मी माझे नाव महाराष्ट्र शासन राजपत्र नोंदणी क्रं. (एम-२१४२३६९) अन्वये बदलले असून यापुढे मी **सौ.संगीता बाळू चव्हाण** (Sangita Balu Chavan) या नावाने ओळखली जाईल.

**नवीन नावाने सही/-**
**संगीता बाळू चव्हाण**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, १) श्रीमती.हाजीरा अ हमीद खान बुबेरे २) श्रीमती.अरफाना मन्सुर पटेल ३) जहीर अहमद अब्दुल राऊत मुल्ला ४) उमरमियाँ गुलामसाहेब पटेल रा.तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड यांना फाईल नं.६७१+८७२, येथील तळोजा नोड, प्लॉट नं.२ अ प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भूखंडाचे वाटप झालेले आहे. सदर भूखंड हे वर उल्लेख केलेले शेतकरी यांच्या संपादीत जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के गावठाण विस्तार योजनेंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबई कडून खालीलप्रमाणे पात्रता मंजूर होवून करारनामा झाला आहे. वर नमूद शेतकऱ्याकडून खालील वर्णन केलेला भूखंड माझे अशिल मे.सुप्रिम मिडलॅड प्रायव्हेट लिमिटेड तर्फे डायरेक्टर श्री.जयंतीलाल खिमजीभाई नाकरानी पत्ता : २१२/२१३, साई चेंबर, प्लॉट नं.४४, सेक्टर ११, सी.बी.डी. बेलापूर नवी मुंबई यांनी त्रिपक्षीय करारनामा / हस्तांतरण करण्याचे व विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**
**सिडको फाईल क्रमांक ६७१+८७२ तळोजा नोड**

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| तळोजा | ७ | २ अ | ९९.९९ चौ.मी. |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यांनतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.
दि.३०/०७/२०२१

**सही/-**
**ॲड.सुजाता जो.पाटील**
**विसावा को.ऑप.हौ.सोसायटी,**
**प्लॉट नं.ई १२४/१३, सेक्टर १२,**
**खारघर, नवी मुंबई-४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**

रायगड जिल्ह्यात आदिम जमातीचे बहुउद्देशीय संकुल उभारणीची प्रक्रिया प्रगतीपथावर

# मौजे जांभूळपाडा येथील बहुउद्देशीय संकुलाच्या प्राथमिक प्रारुप आराखड्यास शासनाची मान्यता : आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

रायगड जिल्ह्यात आदिम जमातीचे बहुउद्देशीय संकुल उभारणीची प्रक्रिया प्रगतीपथावर आली आहे. जिल्ह्यातील सुधागड-पाली तालुक्यातील मौजे जांभूळपाडा येथे आदिम जमाती (PVTG) (कातकरी) यांच्याकरिता बहुद्देशीय संकुल उभारण्यासाठी शासनाची मान्यता प्राप्त आहे. याबाबत उपमुख्यमंत्री श्री.अजित पवार यांच्याकडे पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने उपमुख्यमंत्री महोदयांनी २०२१ च्या अर्थसंकल्पात रायगड जिल्ह्यातील आदिम जमातीसाठी बहुउद्देशीय संकुल उभारण्याची घोषणा केली होती.



राज्य शासनाची मान्यताप्राप्त असलेल्या या बहुउद्देशीय संकुलासाठी मौजे जांभूळपाडा, ता. सुधागड येथील सुमारे ५० एकर शासकीय जागा निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार आदिवासी विकास विभागाने या बहुउद्देशीय संकुलाच्या प्राथमिक प्रारुप आराखड्यास तत्वत: मान्यता प्रदान केली आहे. या आराखड्यानुसार १ हजार विद्यार्थ्यांसाठी निवासी शाळा १ ली ते १२ वी, ५०० मुलांच्या राहण्याची क्षमता असलेले वसतिगृह, ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय, २०० खाटांचे बहुउद्देशीय रुग्णालय, ५०० लोकांच्या क्षमतेचे सभागृह, तंत्रशिक्षण-कौशल्य विकास, १ हजार मे.टन क्षमतेचे साठवणूक गोदाम, २०० कर्मचारी निवासस्थाने, शेती व शेळीपालनासाठी कृषी कौशल्य विकास केंद्र, वनधन प्रक्रिया केंद्र, बागबगीचा- खेळ मैदाने, संरक्षक भिंत, पाणीपुरवठा, विद्युतीकरण, सोलार संयंत्रे, मलनि:स्सारण केंद्र, वाहनतळ, संकुलासाठी अंतर्गत रस्ते व इतर सुविधांसह आदिवासी निर्मित वस्तूंचे प्रदर्शन केंद्र आदी विविध सुविधांचा समावेश यामध्ये आहे.

रायगड जिल्ह्यातील कातकरी या आदिम जमातीमधील सुमारे ३७ हजारांहून अधिक कुटुंबांचा विकास यामुळे होणार आहे. केंद्रीय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या नागपूर प्रादेशिक कार्यालयाच्या मान्यतेसाठी हा आराखडा पाठविण्यात येणार आहे. त्यानुसार मौजे जांभूळपाडा येथील शासकीय जागा आदिवासी विकास विभागास हस्तांतरीत करण्यात येणार आहे. या बहुउद्देशीय संकुलाच्या उभारणीसाठी अनुकूल असलेली शासकीय जागा पर्यावरण मंत्रालयाची मान्यता मिळाल्यावर आदिवासी विकास विभागास हस्तांतरीत करुन या संकुल उभारणीची प्रक्रिया विभागामार्फत सुरू करण्यात येईल.

रायगड जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी कटिबद्ध असून सातत्यपूर्ण प्रयत्नांतून या बहुउद्देशीय संकुलाच्या उभारणीची कार्यवाही प्रगतीशिल आहे, असे मत पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी व्यक्त केले.


# तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर पनवेल महापालिकेची तयारी सुरु

## आयुक्तांनी घेतला आढावा ; पॉझीटिव्हिटी रेट कमी करण्यात पालिकेला यश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोविडची दुसरी लाट आटोक्यात येत असली तरी तज्ज्ञांनी कोविडची तिसरी लाट येण्याचे भाकित केले आहे. याच पार्श्वभूमीवर आयुक्त गणेश देशमुख यांनी वैद्यकिय आरोग्य विभागाची आढावा बैठक घेतली. यावेळी विविध विषयांवरती चर्चा करण्यात आली.

पहिल्या व दुसर्या लाटेतील ऑक्सीजन तुटवडा लक्षात घेता तिसर्या लाटेमध्ये ऑक्सीजनचा पुरवठा कमी पडू नये यासाठी करण्यात येणार्या उपाय योजनांचा आढावा घेण्यात आला. यावेळी , मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी यासंदर्भातील पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन केले. ऑक्सीजन प्लॅन्टचे काम लवकरात लवकर पुर्ण करण्याच्या सूचना यावेळी अधिकार्यांना देण्यात आल्या.तिसर्या लाटेमध्ये आवश्यक असणारे आयसीयू खाटा, ऑक्सीजन खाटा, साध्या खाटा, लहान मुलांच्या आयसीयू खाटा, ऑक्सीजन खाटा यांच्या नियोजनांवर चर्चा करण्यात आली.




या अनुषंगाने खासगी रूग्णालये, शासकीय रूग्णालये, पालिकेचे रूग्णालय तेथील सोयी सुविधा वाढविण्यावर अधिकार्यांनी भर द्यावा, त्या दृष्टीने तातडीने कामास लागावे असे आदेश आयुक्तांनी यावेळी दिले. तिसर्या लाटेमध्ये लागणारी महत्वाची औषधे पालिकेने खरेदी करून ठेवावी जेणे करून ऐनवेळी औषधांची कमतरता पडणार नाही. यासाठी प्रमुख विक्रेत्याबरोबर चर्चा करावी आणि महत्वाची औषधे खरेदी करावी अशा सूचना यावेळी आयुक्तांनी दिल्या.तिसर्या लाटेत वॉर रुम अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ पालिकेने उभा करावे आणि वॉर रूम अधिक बळकट करावी असे आदेश वैद्यकिय आरोग्य विभागाला आयुक्तांनी दिले. यावेळी उपायुक्त सचिन पवार, मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, बाबासाहेब चिमणे, वैद्यकिय अधिकारी डॉ. मनिषा चांडक, डॉ. प्रियांका माळी, साद देशमुख, डॉ. भक्तराज भोईटे, डॉ. सुरेश पंडित, स्वप्नाली चौधरी, महाले, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.आत्तापर्यंत झालेले शासकिय व खाजगी लसीकरणाचा आढावा घेऊन, जास्तीत जास्त लसीकरण करण्यासाठी उपाय योजनांवर भर द्यावा, लसीकरण रोज व्हावे यासाठी प्रयत्न करा अशा सूचना यावेळी आयुक्तांनी वैद्यकिय आरोग्य विभागास दिल्या.

# शिवसेना महिला आघाडीमार्फत स्वच्छता मोहिमेसह विद्युत तांत्रिक बिघाडाचा प्रश्न काढला निकाली

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शिवसेना महिला आघाडीच्या माध्यमातून शहरातील अनेक प्रभागात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. तसेच कित्येक ठिकाणी विद्युत पुरवठ्या संदर्भात तांत्रिक बिघाड झाले होते. त्याची सुद्धा पुर्तता करून घेण्यात येत आहे.



शिवसेना पनवेल शहर महिला आघाडी संघटीका अर्चना अनिलकुमार कुळकर्णी यांनी गेल्या काही दिवसात पडलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी रानटी गवत वाढले होते. त्याचप्रमाणे नाल्यांमध्ये घाण साचली होती. या संदर्भात लक्ष घालून त्याची सफाई करून घेतली. त्याचप्रमाणे या पावसामुळेच वीजेचा प्रश्न सुद्धा निर्माण झाला होता. त्याच्या तक्रारी सुद्धा स्थानिक रहिवाशांनी कुळकर्णी यांच्याकडे केल्या होत्या.

त्यानुसार त्यांनी सुद्धा वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करून तो प्रश्न निकाली काढला आहे. सामाजिक कार्यामध्ये शिवसेना प्रथम धावून जाते. हे महिला आघाडीने दाखवून दिले आहे.

# वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्थेने पूरग्रस्तांना केले जीवनावश्यक वस्तूचे वाटप

**दै.रायगड नगरी । उरण**

महाड येथे नुकताच झालेल्या पुरामध्ये अनेक कुटुंब बेघर झाली आहेत. त्यांच्या घरामध्ये काहीच उरले नाही अशा गरज वंतांना उरण तालुक्यातील वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्थेने घरोघरी जाऊन जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले आहे.

उरण मधील वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्था गेल्या अनेक वर्षे निसर्ग आणि निसर्गातील प्राणी पक्षी वाचविण्याबरोबर सामाजिक बांधिलकी ही जपण्याचे काम करत आहे. मागील महाड पुरामध्ये ही या संस्थेच्या माध्यमातून मदतिचा हात दिला होता. २०१९ मध्ये सांगली मिरज मध्ये जाऊन ही प्रत्यक्ष या संस्थेने घरा घरामध्ये जाऊन संस्थेने मदतीचा हात दिला होता. असे अनेक वेळा मदतीचे कार्य वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्थेच्या माध्यमातून होत आहे.

आणि नुकताच झालेल्या पुरामध्ये महाड मधील जनतेचे मोठे नुकसान झाले आहे.

महाड मधील बिरवाडी आसनपोई बौद्ध वाडा आणि विरवाडी आदिवासी वाडीतील कुटुंबांना प्रत्यक्ष घरी जाऊन जीवनावश्यक वस्तूचे वाटप करण्यात आले. यामध्ये तांदूळ ६०० किलो, तेल, साखर, पोहे, बिस्कीट, पाकीट दूध, ३० बॉक्स बिस्लरी, आवशयक लागणारे कपडे आदी सामानाचे वाटप करण्यात आले आहे.

या वेळी वन्यजीव निसर्ग संरक्षणचे सहकारी जी सी घरत, मढवी, संस्थेचे अध्यक्ष विवेक केणी, उपाध्यक्ष आनंद मढवी, चिरनेर ग्रामपंचायत सदस्य रमेश फोफेरकर, सदस्य दिलीप मढवी, काशिनाथ खारपाटील, मनोहर फुंडेकर, अनिल सुर्यवंशी, राजा कडू, अभिमन्यू पाटील, राजेंद्र लोंगले, अनिल कदम, प्रकाश मोकल, पंकज घरत, विकी साळवी, गणेश मुकणे, आदी उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

सुचना देण्यात येते की, आमचे अशिल मे.किशोर काशिनाथ म्हात्रे ह्यांनी हे खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिनी कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : वळवली, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्वे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ७८ | १० | ०-३१-३० पो.ख. ०-०३-३० एकूण क्षेत्र ०-३४-६० | ०.५६ |
| **एकूण ०-३४-६० गुंठे करिता वचन चिठ्ठीचा विषय आहे.** | | | |

(यापुढे सदर जमिनीचा उल्लेख सदरहू मिळकत असा केला आहे.) सदरहू मिळकतींचे मालक मयत अनंता बाळु उलवेकर तर्फे कायदेशीर वारस १) संगीता अनंता उलवेकर २) श्री.आशिष अनंता उलवेकर, ३) श्री.तेजस अनंता उलवेकर, ४) श्री.दिपक महादेव ठाकूर यांचेकडून सदरहू मिळकत ही दि.२२/०७/२०२१ रोजीच्या कायम खरेदी करणे संदर्भात वचनचिठ्ठी त्यात नमूद अटी व शर्तीवर साक्षांकित केली आहे. सदर जमिनीच्या मालकानं सदरहू मिळकतीचे सर्व हक्क व अधिकार हे माझे अशिल यास तबदील करण्याचे मान्य केले आहे. परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकती बद्दल कोणाही व्यक्ती / संस्था / कंपनी ह्यांचे कोणत्याही प्रकारे, विक्री, गहाणपत्र, भाडेकरार, अभिहस्तांकन, बक्षिसपत्र, न्यास, देणगी, लिअन, हवाला, ताबा सुविधाधिकार, वारसाहक्क, याद्वारे किंवा अन्यथा कशाही प्रकारे उक्त मालमत्तेत किंवा त्यावर किंवा तिच्या कोणत्याही भागावर कोणताही हक्क, हितसंबंध दावा किंवा मागणी असणाऱ्या सर्व व्यक्ती / संस्था / कंपनी ह्यांचे तो लेखी स्वरुपात संबंधित कागदपत्रासहीत नोटराईज्ड प्रती खऱ्या नक्कल म्हणून खालील निम्नस्वाक्षरीकाराकडे शॉप नं.२६, प्रभात सेंटर, सेक्टर १ ए, सीबीडी बेलापूर, ता.जि.ठाणे, नवी मुंबई ४००६१४. येथे आजच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ दिवसांत कळविण्याची विनंती करण्यात येते. अन्यथा सदर मिळकतीवर त्यांनी तो जाणूनबुजून सोडून दिला असल्याचे समजून, आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.
दि.२९/०७/२०२१

**सही/-**
**सुनिता राम पाटील**
**खरेदीदाराचे वकील**
**९८६७६८८७८८**
(SMS whatsapp only)
(M.Com, M.A., L.L.M., G.D.C.&A)
**(वकील उच्च न्यायालय व नोटरी भारत सरकार)**

श्री.भाकरे साो.कोर्ट

ॲड.निलीमा गाडे
ॲड.मीना ठाकूर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे न्यायालयात पनवेल येथे
दि.चौ.अर्ज क्र.७२४/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२/९/२०२१

१) श्रीमती.संगीता विभव शिवगण
वय : ४२ वर्षे, व्यवसाय : नोकरी
२) कुमारी अभिलाषा विभव शिवगण
वय : १३ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
३) कुमार प्रजवल विभव शिवगण
वय : ९ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
रा.गॅलक्सी गार्डन, बिल्डींग नं.११,
फ्लॅट नं.३०१, तिसरा माळा,
गाव पाषाणे, तालुका : कर्जत, जिल्हा : रायगड
तात्पुरता पत्ता : रुम नं.२११, बिल्डींग नं.१४,
ए-विंग, नर्मदा को.हौ.सो.लल्लुभाई कंपाऊंड,
मानखुर्द मुंबई ४०००४३
(अर्जदार क्र.२ व ३ अज्ञान असल्याने त्यांच्या वतीने
अर्जदार क्रं.१ नैसर्गिक पालक आहेत) अर्जदार

१) वरील पैकी अर्जदार यांनी मा.न्यायालयात वारस दाखला मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क्र.१ ते ३ हे मयत विभव देवजी शिवगण यांचे वारसदार असून अर्जदार क्रं.१ या मयत विभव देवजी शिवगण यांची पत्नी आहे व अर्जदार क्र.२ मुलगी व ३ मुलगा आहे. मयत विभव देवजी शिवगण दिनांक १२/०५/२०२० रोजी रुम नं.२११, बिल्डींग नं.१४ ए विंग, नर्मदा को.हौ.सो.लल्लुभाई कंपाऊंड मानखुर्द मुंबई ४०००४३ येथे आजाराने मृत्यू पावलेत

**२) मयत विभव देवजी शिवगण यांच्या नावे असलेल्या फ्लॅटचे / स्थावर मालमत्तेचे परिशिष्ट**
**गॅलक्सी गार्डन, बिल्डींग नं.११, फ्लॅट नं.३०१,**
**तिसरा माळा, गाव पाषाणे, तालुका : कर्जत, जिल्हा : रायगड**

३) याप्रमाणे मयत विभव देवजी शिवगण यांचे अर्जदार क्र.१ ते ३ हे खरे वारसदार असून यांच्या व्यतिरिक्त इतर कुणीही कायदेशीर वारसदार नाहीत. अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबाबत कोणाचे हक्क व अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न घेतल्यास सदरहू न्यायालय वरील अर्जदार यांच्या हक्काबाबत पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर मयताचे वारस दाखला देण्यात येईल व त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दि.७ माहे जुलै २०२१ रोजी माझे सहीने आणि न्यायालयाच्या शिक्क्याने दिले.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**
कोर्टाचा शिक्का
**सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

राव साहेब

ॲड.राजेश तांडेल

### जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर), पनवेल यांच्या न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.९१३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.८/९/२०२१

१) श्री.शंकर बाळकृष्ण पाटील
वय सुमारे ६३ वर्षे, व्यवसाय : शेती
२) श्री.कमलाकर बाळकृष्ण पाटील
वय सुमारे ५९ वर्षे, व्यवसाय : शेती
३) श्री.गजानन बाळकृष्ण पाटील
वय सुमारे ४९ वर्षे, व्यवसाय : शेती
४) श्रीमती.सुभद्रा एकनाथ घरत
वय सुमारे ५४ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
सर्व रा.मुक्काम पोस्ट : बोकडविरा,
तालुका : उरण, जिल्हा : रायगड अर्जदार

वरील अर्जदाराचे वडील मयत बाळकृष्ण नारायण पाटील हे कोणतेही मृत्यूपत्र न करता दि.०६/१०/२०२० रोजी मौजे : बोकडविरा, तालुका : उरण, जिल्हा : रायगड येथे मयत झाले आहेत. मयत बाळकृष्ण नारायण पाटील यांच्या नावे असलेल्या मौजे : बोकडविरा, ता.उरण, जि.रायगड येथील मिळकतीचा तपशिल :-

| गाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र सुमारे ऐ.गुंठे-आणे |
|---|---|---|---|
| मौजे बोकडविरा, ता.उरण, जिल्हा : रायगड | १२४ | १४/१ | ०-०१-० |
| मौजे बोकडविरा, ता.उरण, जिल्हा : रायगड | १३० | ३ | ०-१४-१२ |
| मौजे बोकडविरा, ता.उरण, जिल्हा : रायगड | ६९ | ७ | ०-७-१ |
| मौजे बोकडविरा, ता.उरण, जिल्हा : रायगड | १८३ | ५ | ०-०६-४ |
| मौजे बोकडविरा, ता.उरण, जिल्हा : रायगड | १७७ | ९ | ०-०४-० |
| मौजे बोकडविरा, ता.उरण, जिल्हा : रायगड | ४३ | १ | ०-१६-२ |
| मौजे बोकडविरा, ता.उरण, जिल्हा : रायगड | ५१ | ४ | ०-४-३ |
| मौजे बोकडविरा, ता.उरण, जिल्हा : रायगड | ९ | ९ | ०-११-७ |
| मौजे बोकडविरा, ता.उरण, जिल्हा : रायगड | ११४ | ५ अ | ०-१४-१ |
| मौजे बोकडविरा, ता.उरण, जिल्हा : रायगड | १३१ | ५ अ | ०-७-९ |
| मौजे बोकडविरा, ता.उरण, जिल्हा : रायगड | १३४ | ७ | ०-७-३ |
| मौजे बोकडविरा, ता.उरण, जिल्हा : रायगड | १२५ | ९ | ०-६-६ |
| मौजे बोकडविरा, ता.उरण, जिल्हा : रायगड | १६० | ६ | ०-०-५ |
| मौजे बोकडविरा, ता.उरण, जिल्हा : रायगड | १६४ | ६ | ०-७-७ |
| मौजे बोकडविरा, ता.उरण, जिल्हा : रायगड | ३१ | २ ब | ०-१५-२ |
| मौजे बोकडविरा, ता.उरण, जिल्हा : रायगड | १६६ | १ अ | ०-२-३ |
| मौजे बोकडविरा, ता.उरण, जिल्हा : रायगड | १४६ | ६ | ०-८-० |
| मौजे बोकडविरा, ता.उरण, जिल्हा : रायगड | १६० | ३ | ०-७-६ |

सदरहू मिळकतीमध्ये मयत बाळकृष्ण नारायण पाटील ह्यांचा असलेला हक्क, सदरहू मिळकतीची किंमत सुमारे ५,३५,०००/-

मयत बाळकृष्ण नारायण पाटील ह्यांच्या वारसाबाबत उक्त अर्जदाराने वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशा लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२९ माहे जुलै २०२१ रोजी माझ्या सहीने दिले.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**
कोर्टाचा शिक्का
**सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**


# संक्षिप्त...

## आईसह मुले बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आईसह दोन मुले बेपत्ता झाल्याची घटना पनवेल शहरात घडली असून याबाबत त्यांच्या नातेवाईकांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

जैबुनीसा नुरद्दीन सयद नालबंद (३० रा.कच्छी मोहल्ला, पनवेल), उंची १५५ सेमी, बांधा मध्यम, रंग गोरा, केस



लांब, चेहरा गोल, नाक सरळ असून अंगात पंजाबी ड्रेस, सोबत मोबाईल फोन आहे. त्याचबरोबर मुलगा शोएब उंची १६० सेमी बांधा सडपातळ, रंग सावळा, केस बारीक, चेहरा गोल, नाक सरळ असून अंगात पॅन्ट व शर्ट आहे. तर मुलगी सबा उंची १४५ सेमी, बांधा मध्यम, रंग सावळा, केस आखूड, चेहरा उभट, नाक सरळ लहान असून अंगात जिन्स पॅन्ट व टी-शर्ट घातले आहे. ते तिघेही राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता कुठेतरी निघून गेले आहेत. यांच्याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी २७४५२३३३ किंवा पो. हवा.एस.एम.थोरात मोबा नं.८८९८९५८५४० येथे संपर्क साधावा.

## पूरग्रस्तांच्या मदतीसाठी वडवली ग्रामस्थ एकवटले; जीवनावश्यक वस्तू व साहित्याचे वाटप

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

पुरामुळे महाड शहर व आजूबाजूच्या गावांवर संकट ओढवले आहे. अनेकजण या बाधित लोकांना मदतीसाठी पुढाकार घेत आहेत.

वडवली व शिस्ते या छोट्याशा गावातील लोकांनी देखील मोठ्या प्रमाणात जीवनावश्यक वस्तू व साहित्य पूरग्रस्तांना देऊन मदत केली आहे.

विशेष बाब म्हणजे गावातील युवक, तरुण व लहान मुलांनी या मदतीसाठी पुढाकार घेतला आहे. आणि त्याला मोठ्यांनी महत्वपूर्ण साथ दिली. या मदत कार्यासाठी वेदांत दिलीप कासारे, अरबाझ चिवीलकर, अरबाझ नाईक, मुस्ताक तलवसकर, अष्फाक जंजीरकर, अक्रम चिवीलकर, अमजद तलवसकर, इमरान पसवारे, इब्राहिम चिवीलकर, इम्तियाज मनीयार, रिझवान चिवीलकर अमानुल्ला चिवीलकर आदींनी परिश्रम घेतले. एक हात मदतीचा आपल्या माणसांसाठीचा या उक्तीप्रमाणे अजूनही मदत करण्यात येणार आहे असे वेदांत कासारे याने सांगितले.

# संभाव्य अतिवृष्टीच्या इशाऱ्याबाबत रायगडच्या पालकमंत्री ना. अदिती तटकरे यांनी प्रशासनाला केले सतर्क

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

पोलादपूर तालुक्यातील २००५ मध्ये दगड गस्त झालेल्या गावांबद्दल आढावा घेऊन पालकमंत्री ना. अदिती तटकरे यांनी येत्या काही दिवसात राज्यात होणाऱ्या अतिवृष्टीचा इर्शाय़ाकडे प्रशासनाला सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

पोलादपूर येथील तहसील कार्यालयामध्ये प्रभारी तहसीलदार समीर देसाई, पेणचे प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार आणि प्रमुख कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत अतिवृष्टी पूरग्रस्त आणि दरडग्रस्त गावांच्या मदत कार्य तसेच रस्ते पुनर्निर्माणाचा आढावा ना. अदिती तटकरे यांनी घेतला.



दरडग्रस्त व पुरबाधित गावांच्या यादीनुसार पोलादपूर तालुक्यातील गावांमध्ये कोणत्याही प्रकारची आपत्ती आगामी काळात अतिवृष्टीच्या इशाऱ्यानुसार ओढवली जाऊ नये, यासाठी सतर्कता बाळगण्याची खबरदारी घेण्यास यावेळी पालकमंत्री ना.अदिती तटकरे यांनी सांगितले. साखर सुतारवाडी, केवनाळे येथे दरड कोसळली आणि आंबेमाचीवर दरड कोसळण्यापुर्वी नाणेघोळ येथे ग्रामस्थांना सुरक्षित स्थळी हलविले तशा पध्द-तीने येत्या काळात कोणत्याही प्रकारची शक्यता जाणवल्यास नजिकच्या सुरक्षित ठिकाणी ग्रामस्थांना हलविण्यात येऊन सर्व सोयी संभाव्य अतिवृष्टीकाळात देण्याचे निर्देश यावेळी पालकमंत्री ना अदिती तटकरे यांनी दिले. यावेळी पुरग्रतांना होणाऱ्या मदतीचे अन्नधान्य, चादर तसेच टॉवेलच्या किटचे पॅकेट स्वतः अदिती तटकरे यांनी उघडून पाहणी केली.

# विशाल सावंत आणि मित्र परिवाराचा पूरग्रस्तांना मदतीचा हात



**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाड येथे झालेल्या पूरात नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्याना आता सर्व स्तरातून मदत पोहोचत आहे. पनवेलमधील विशाल सावंत आणि मित्र परिवाराने देखील ३०प्रकारच्या दैनंदिन वापरातील साहित्य ७० कुटुंबातील नागरिकांपर्यंत पोहोचविले.

महाड येथील दादली, शिरवली व महाड शहरात विशाल सावंत आणि मित्र परिवाराने पूरग्रस्तांपर्यंत मदत पोहोचवण्याचे ठरवले.यासाठी फक्त एक मॅसेज मित्र आणि आप्तेष्टांपर्यंत पाठवला गेला आणि दोन दिवसात सत्तर जणांना पुरेल असे तीस वस्तूंचे ७० कीट तयार केले गेले. त्यामध्ये पाणी बोटल्स ,चटई, मसाला,साखर, मूग,चणे, चहा पावडर, बिस्किटस, साबण अंगाचे आणि कपड्याचे, डेटॉल, औषधे,तांदूळ, गव्हाचे पीठ, तूर डाळ, मूग डाळ, चादरी,टॉवेल, सॅनिटेन पॅड, सॅनिटायझर, माचिस, मेणबत्ती,खोबरेल तेल, गाऊन, साड्या, लहान मुलांचे कपडे, मच्छर अगरबत्ती, मीठ, फरसाण, पोहे, कफ सिरप यांचा समावेश होता. शहरात परिस्थिती अत्यंत विदारक होती. तळमजल्यावर असलेली आणि बैठी घरे, व्यापारी यांचे अतोनात नुकसान झाले होते. जे नागरिक मदत घेऊन जातात ते सर्व बहुतकरून शहरात जातात.

यामध्ये ज्यांचे नुकसान झाले नाही ते देखील मदत घेण्यास अग्रेसर असलेले दिसून येत आहेत.ग्रामीण भागात मदत हवी तशी पोहोचली नाही. जे समोर दिसतात त्यांनाच मदत पोहोचत आहे. आड वाटेला जी कुटुंब राहतात ते दुर्लक्षित होत आहेत. त्यामुळेच आम्ही दादली तसेच शिरवली येथील काही भाग निवडून त्याठिकाणी या मित्र परिवाराने मदत पोहोचवली. सध्या पूरग्रस्त भागात साथीचे रोग पसरण्याची शक्यता आहे. त्यासाठी आरोग्य शिबिरे आयोजित व्हावी. चिखलाचे साम्राज्य मोठ्या प्रमाणात आहे. त्यासाठी सामुग्री आणि मनुष्य बळ अपुरे पडते ते वाढलं पाहिजे असे दिसून आले. यासाठी विशाल सावंत यांच्या सोबत धिरज कदम, सुरज मरले, हर्षद नावले, निलेश लोकरे,गणेश लोकरे,सुशांत पाटील,समीर मते, ज्ञानेश्वर पारधी, रूपेश चव्हाण, किशोर विचारे, रितेश सावंत, अनिकेत सावंत, ओंकार जाधव, निशान पाटील, भूषण फेगडे, अमित पुजारी आदींनी प्रयत्न केले.

# 'कोशिश फाऊंडेशन'च्या वतीने ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या 'कोशिश फाऊंडेशन'च्या वतीने ०५ ऑगस्ट रोजी ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

मराठी व इंग्रजी या दोन भाषेत आणि तीन गटात हि स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेतील एकूण विजेत्यांना ५० हजार रुपयांची पारितोषिके देण्यात येणार आहेत. गट 'अ' साठी (इयत्ता पहिली ते चौथी) मी वर्गाचा मॉनिटर झालो तर, शाळा कधी चालू होणार?, मी मुख्याध्यापक झालो तर, माझा आवडता विषय, गट 'ब' साठी (इयत्ता पाचवी ते सातवी) मी पंतप्रधान झालो तर, मी देव झालो तर, घराचे प्रतिनिधित्व कुणाकडे? आई कि बाबा?, माझा आवडता विषय, तर गट 'क' साठी (इयत्ता आठवी ते दहावी ) नेतृत्व वारसा हक्काने कि कर्तृत्वाने, माझा आदर्श नेता, पनवेल नगरीच्या विकासात आमदार प्रशांतदादा ठाकूर यांचे योगदान, माझा आवडता विषय, हे विषय या स्पर्धेसाठी असणार आहेत. स्पर्धा प्रवेश नोंदणीची अंतिम तारीख ०२ ऑगस्ट असून संपर्क क्रमांक ७७५७०००००००, किंवा ीहळीहर्षीपवरींळेप.ीसिारळश्र.लो या ईमेल आयडीवर प्रवेश नोंदणी करता येणार आहे. या स्पर्धेचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सभागृहनेते व कोशिश फाऊंडेशनचे अध्यक्ष परेश ठाकूर यांनी केले आहे.

# जेष्ठ नागरिकांच्या लसीकरणाबाबत युवा सेनेच्या मागणीची महापालिकेने घेतली दखल

## युवासेनेच्यावतीने पनवेल महापालिकेचे मानले आभार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जेष्ठ तसेच प्रकृतीमुळे घराबाहेर पडू न शकणाऱ्या नागरिकांना निवासस्थ-ानीच लसीकरण उपलब्ध करून देण्याबाबत युवासेनेने मागणी केली होती. कोरोना संकटकाळात जनतेला अनेक प्रश्नांना सामोरे जावे ला-गले आहे. लसीकरणादरम्यान शासकिय लसीकरणासाठी स्लॉट न मिळणे आणि खाजगी लसीकरण केंद्रांवरील गर्दी ह्यामुळे अनेकांची गैरसोय होत आहे. त्यातच अनेक वृद्ध नागरिक तसेच प्रकृतीमुळे घराबाहेर न पडता येणारे नागरिक लसीकरणापासून वंचित राहत असल्याचे दिसून आले.

या अनुषंगाने पनवेल महानगरपालिका क्षेत्रामधे अश्या नागरिकांसाठी घरोघरी जाऊन लसीकरण सुविधा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी युवासेनेने केली होती. महानगरपालिका क्षेत्रातील लसीकरण केंद्रांवर उडणारा गोंधळ आणि त्यात तास-नतास लसीकरण केंद्रांवर होणाऱ्या खोळंब्यामुळे जेष्ठ नागरिक तसेच प्रकृतीमुळे अंथरुणावर असलेल्या नागरिकांना लसीकरणापासून वंचित रहाव लागत आहे. अश्या नागरिकांच्या सोयीसाठी महानगरपालिका क्षेत्रामधे जेष्ठ व काही कारणास्तव अंथरुणावर खिळून पडलेल्या नागरिकांसाठी घरोघरी जाऊन लसीकरण सुविधा उपलब्ध करून द्यावी व त्यासाठी आशा सेविकांच्या माध्यमातून केलेल्या सर्वेक्षणाचा आधारावर नोंदणी करावी तसेच एखादा नोंदणीसाठी विशेष संपर्क क्रमांक जाहीर करून त्याद्वारे लसीकरण नियोजीत करण्याची मागणी युवासेना पनवेल विधानसभा अधिकारी पराग मोहिते ह्यांनी महापालिका आयुक्तांकडे केली होती. त्यानुसार पनवेल महापालिकेने अश्या नागरिकांसाठी घरोघरी जाऊन लसीकरण सुविधा सुरू केलेली आहे. युवासेनेच्या मागणीला मिळालेल्या या यशामुळे नागरिकांना आता सुलभपणे लसीकरण करून घेणे शक्य होणार असल्याची प्रतिक्रिया युवासेनेच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे. यावेळी युवासेना उपविधानसभा अधिकारी सनी टेमघरे व शहर अधिकारी निखिल भगत हे देखील उपस्थित होते.

# पेणच्या 'देवदूता' ची महाड, पोलादपूरच्या दरडग्रस्तांना मदत

## सौर ऊर्जेवरील दिव्यांसह जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

**दै.रायगड नगरी । पेण**

मुंबई - गोवा महामार्गावरील अपघातग्रस्तांना नेहमीच मदत करणाऱ्या पेण येथील 'देवदूत' कल्पेश शरद ठाकूर यांच्या साई सहारा प्रतिष्ठानच्या वतीने महाड व पोलादपूर तालुक्यातील पूरग्रस्त व दरडग्रस्तांना मदतीचा हात देऊन सामाजिक दायित्व जपले आहे.



मागील आठवड्यात २२ व २३ जुलैला रायगड जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे महाड व पोलादपूर येथे जनजीवन विस्कळीत झाले आहे. महाड मधील तळीये व पोलादपूर येथल्या केवनाळे, साखर सुतारवाडी, आंबेमाची, नानेगाव येथे दरड कोसळून शेकडो जणांचा मृत्यू झाला आहे. तर महाड शहरात दोन दिवस पुराचे पाणी साचून राहिल्याने अनेक कुटुंबांचे संसार उघड्यावर आले आहेत.

महाड व पोलादपूर येथील या आपत्तीग्रस्तांना मदत करण्यासाठी रायगड सह महाराष्ट्रातील अनेक स्वयंसेवी संस्था पुढे सरसावल्या आहेत. मुंबई - गोवा महामार्गावर अपघात ग्रस्तांच्या मदतीला नेहमीच धावणाऱ्या पेण येथील कल्पेश ठाकूर हे देखील महाडकरांच्या मदतीला पुढे सरसावले आ-हेत. महाड व पोलादपूर येथील आपत्तीनंतर येथील बहुतांश गावात वीजपुरवठा खंडीत झालेला असल्याचे लक्षात घेऊन सौरऊर्जावर चालणारे दिवे, ब्लँकेट, बिसलरी पाण्याचे बॉक्स, खाद्य पदार्थ या बरोबरच जीवनावश्यक वस्तूंचे ५०० कीट महाड शहर, पोल-ादपूर येथील दरडग्रस्त केवनाळे, साखर सुतारवाडी, आंबेमाची, नानेगाव, चरई, चिरखिंड वाडी, सुतार पेडा, राकी आदिवासी वाडी आदी अनेक गावातील खरोखरच आपत्तीग्रस्त नागरिकांना वाटप केले. या नैसर्गिक आपत्तीचा फटका सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या महाड व पोलादपूर येथील पत्रकारांना देखील बसला आहे. हे लक्षात घेऊन महाड व पोलादपूर येथील पत्रकारांना देखील मदतीचा हात त्यांनी पुढे केला. या आपत्तीत पोलीस स्टेशन देखील सुटले नाहीत, महाड येथील तालुका पोलीस स्टेशन व शहर पोलीस स्टेशन हे देखील दोन दिवस पूर्णपणे पाण्याखाली होते. या दोन्ही पोलीस स्टेशन मधील कर्मचारी यांना देखील जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. पोलादपूर येथील पोलिसांची वसाहत पाण्याखाली जाऊन या वसाहती मधील कुटुंबाचे संसार उद्धवस्त झाले त्या कर्मचाऱ्यांना देखील कल्पेश ठाकूर यांच्या साई सहारा प्रतिष्ठानने मदतीचा हात देऊन आपली सामाजिक बांधिलकी जोपासली आहे.

या प्रसंगी अपघातग्रस्तांचे वाली कल्पेश ठाकूर, जेष्ठ पत्रकार सुनिल पाटील, नरेश पवार, नागोठणे पोलीस जितेंद्र चव्हाण, पेण प्रेस क्लब अध्यक्ष देवा पेरवी, विकि पाटील, आकाश तायडे, सागर पाटील, योगेश शिंदे आदींसह साई सहारा प्रतिष्ठानचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

कोरोना काळातही मोफत रुग्णसेवा

मुंबई - गोवा महामार्गावरील अपघातग्रस्तांना नेहमीच मदत करणाऱ्या देवदूत कल्पेश ठाकूर यांनी कोरोना काळातील दीड वर्षांत कोरोना रुग्णांसाठी मोफत रुग्णवाहिका सेवा उपलब्ध केली आहे. पेण तालुक्यातील कोरोना रुग्णांच्या सेवेसाठी साई सहारा प्रतिष्ठानच्या वतीने तीन रुग्णवाहिका चोवीस तास विना मोबदला सेवा देत आहेत. या काळात आतापर्यंत पाचशे पेक्षा जास्त कोरोना रुग्णांना उपचारा साठी मुंबई, पनवेल, नवी मुंबई, अलिबाग येथे उपचारासाठी दाखल करुन त्यांना नवीन जीवन प्राप्त करुन दिले आहे.

# शासकीय अधिकाऱ्यांनी प्रेम व सेवाभावाने कार्य करावे : राज्यपाल

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मातृत्वभाव म्हणजे वात्सल्य व प्रेमभावना. ही भावना केवळ महिलांकडे असते असे नाही तर प्रत्येकामध्ये असते. शासकीय कर्मचारी व अधिकारी यांनी आपले काम केवळ नौकरी म्हणून न करता मातृत्वभाव व सेवाभाव जागवून केले तर कामाचे सोने होईल, समाज उन्नत होईल व पुण्यार्जन देखील होईल असे प्रतिपादन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी आज येथे केले.

पनवेल संघर्ष समितीच्या वतीने राजभवन येथे आयोजित कार्यक्रमात राज्यपालांच्या हस्ते पनवेल, नवी मुंबई, मीरा भायंदर व भिवंडी येथे शासकीय सेवेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा 'कोविड संजीवनी पुरस्कार' देऊन सत्कार करण्यात आला, त्यावेळी राज्यपाल बोलत होते.

करोना काळात पोलीस शिपायापासून महासंचालाकांपर्यंत तसेच पटवाऱ्यापासून सचिवांपर्यंत सर्वांनी चांगले काम केले. संकटकाळी मतभेत विसरून समाजासाठी व देशासाठी कार्य करण्याची उन्नत भावना यावेळी पाहण्यास मिळाली असे नमूद समाजाप्रती सेवाभाव असाच नेहमी कायम राहावा अशी अपेक्षा राज्यपालांनी व्यक्त केली.

रायगडच्या जिल्हाधिकारी निधी चौधरी, प्रांताधिकारी दत्तात्रेय नवले यांना त्यांच्या अनुपस्थितीत सन्मानित करण्यात आले. तर गणेश देशमुख, पनवेल महापालिका आयुक्त, डॉ गिरीशजी गुणे, मुख्य विश्वस्त गुणे हॉस्पीटल,पनवेल, सुधाकर देशमुख, आयुक्त भिवंडी महापालिका, डॉ प्रशांत रसाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी, कल्याण डोबिंवली स्मार्ट सिटी, सुजाता दिलीप ढोले, अतिरिक्त आयुक्त, नवी मुंबई महापालिका, पनवेल विभाग, विजय तळेकर, तहसीलदार, पनवेल, संजय शिंदे, उपायुक्त, मिरा भाईंदर महापालिका, शशिकांत तिरसे, कळंबोली प्रादेशिक परिवहन मोटार निरीक्षक, डॉ सचिन संकपाल, मुख्य अधिष्ठाता उपजिल्हा रुग्णालय पनवेल, डॉ प्रमोद पाटील, पनवेल उपजिल्हा रुग्णालयचे वैदयकीय अधिकारी, डॉ अर्चना राम थडानी, सामाजिक वैदयकिय तज्ञ व स्मिता गवाणकर, सूत्रसंचालक व वृत्तनिवेदिका यांना कोविड संजीवनी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



# मुरुड तालुक्यातील श्री सदस्यांनी महाड येथील पूरग्रस्त भागात राबवली स्वच्छता अभियान मोहीम

**दै.रायगड नगरी । मुरुड**

रेवदंडा येथील डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या मुरुड तालुक्यातील काशीद, मजगाव, आदाड, राजपुरी, आगरदांडा, टोकेखार इत्यादी परिसरातील सुमारे ३८३ श्री सदस्यांनी प्रतिष्ठानचे अध्यक्ष आप्पासाहेब धर्माधिकारी व विश्वस्थ सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली महाड येथील पुरग्रस्त भागातील राजेवाडी, कोंडिवले, दादले, खरवली, कोल या भागातील शाळा, आंगणवाड्या, ग्रामपंचायत कार्यालये तसेच मंदिरे यामधील सुमारे २७ ट्रक गाळ व चिखल, कचरा साफ करून यशस्वी स्वछता अभियान मोहीम राबवली. यावेळी प्रत्येक श्री सदस्याने घरून स्वछतेसाठी लागणारी हत्यारे, जेवणाचा डबा, पाणी, मास्क, सॅनिटाईझर इत्यादी वस्तू सोबत आणून कोरोना विषाणूच्या संसर्गाबाबत शासनाचे सर्व नियम काटेकोरपणे पाळून नियोजनबद्ध सेवाकार्य केल्याचे श्री सदस्य सदानंद मुंबईकर यांनी सांगितले.

## जिल्हा प्रशासनाची तत्परता ; महाड शहराच्या स्वच्छता आणि पाणीपुरवठ्यासाठी...

# तब्बल २५ टँकरने करण्यात आला लाखो लिटर पाणी पुरवठा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यात दि. २१ व २२ जुलै अतिवृष्टीमुळे आलेल्या महापूरात संपूर्ण शहराची वाताहत झाली. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने तात्काळ आवश्यक ती उपाययोजना राबविण्यास सुरुवात केली. येथील नागरिकांना पाणीपुरवठा करणे तसेच स्वच्छतेच्या दृष्टीने उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे होते. त्यानुसार जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) सर्जेराव म्हस्के-पाटील यांनी महाड शहरासाठी पाण्याचे टँकर तात्काळ उपलब्ध करुन देण्याचे नियोजन केले.

दि.२४ जुलै २०२१ रोजी रोहा-२, माणगाव ७, म्हसळा-२, पेण-१ असे एकूण १२ टँकरने १ लाख ३८ हजार लिटर पाणीपुरवठा करण्यात आला. दि. २५ जुलै २०२१ रोजी रोहा-२, माणगाव-७, म्हसळा-२, पेण-१, श्रीवर्धन-२, तळा-१, असे एकूण १५ टँकरने १ लाख ७४ हजार लिटर. दि. २६ जुलै २०२१ रोजी रोहा-२, माणगाव-५, म्हसळा-२, पेण-१, श्रीवर्धन-२, तळा-१, मुंबई महानगरपालिका-४,उरण-२, पुणे-२ नवी मुंबई महानगरपालिका-४ असे एकूण २५ टँकरने २ लाख ७४ हजार लिटर. दि. २७ जुलै २०२१ रोजी रोहा-२, माणगाव- ५, म्हसळा-२, पेण-१, श्रीवर्धन-२, तळा-१, मुंबई महानगरपालिका-४,उरण-२, पुणे-२ नवी मुंबई महानगरपालिका-४ असे एकूण २५ टँकरने २ लाख ७४ हजार लिटर. दि. २८ जुलै २०२१ रोजी रोहा-२, माणगाव-५, म्हसळा-२, पेण-१, श्रीवर्धन-२, तळा-१, मुंबई महानगरपालिका-४,उरण-२, पुणे-२ नवी मुंबई महानगरपालिका-४ असे एकूण २५ टँकरने २ लाख ७४ हजार लिटर.